# अभिषेक

आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये विविध देवतांना विविध सूक्त, स्तोत्रे म्हणत स्नान म्हणजेच अभिषेक करणे हे मोठे पुण्यदायी व इच्छित मनोकामना पूर्ण करणारे कर्म म्हणून सांगितले गेले आहे. काही जणांकडे घरातील देवांना वर्षातील ठराविक दिवशी अभिषेक करण्याची प्रथा असते.  तसेच दर चतुर्थीस गणपतीला, सोमवारी शंकराला, मंगळवार/शुक्रवार अथवा पौर्णिमेस देवीला, गुरुवारी दत्ताला, शनिवारी मारुतीला, रविवारी/ बुधवारी विष्णूला, रविवारी खंडोबाला अभिषेक करणे विशेष पुण्यकारक समजले जाते.

| देवता | सूक्ते किंवा स्तोत्र |
|---|---|
| गणपती | ब्रह्मणस्पती सूक्त, गणपती सूक्त, अथर्वशीर्ष, संकटनाशन स्तोत्र इ.<br><br>सहस्रावर्तने - अथर्वशीर्ष किंवा संकटनाशन स्तोत्राच्या १००० आवर्तनांनी अभिषेक |
| देवी | श्री सूक्त, शिवमहिम्न स्तोत्र इ. |
| शंकर | रुद्र , शिवमहिम्न स्तोत्र इ.<br><br>एकादशिनी- ११ आवर्तने<br><br>लघुरुद्र- ११ एकादशिनी (१२१ आवर्तने)<br><br>महारुद्र- ११ लघुरुद्र (१३३१ आवर्तने)<br><br>अतिरुद्र- ११ महारुद्र (१४६४१ आवर्तने) |
| विष्णू | पुरुषसूक्त, पवमान इ. |
| मारुती | रुद्र, शिवमहिम्न स्तोत्र इ. |

# अभिषेकाच्या  साहित्याची साधारण यादी

(प्रत्यक्ष पूजेपूर्वी साहित्याविषयी गुरुजींचा सल्ला घ्यावा)

| | | | |
|---|---|---|---|
| हळद  कुंकु गुलाल बुक्का, | हार ,फुले | गूळ खोबरे | समई, नीरांजन |
| सुपाऱ्या १० | विड्याची पाने २५ | तांदूळ १ वाटी | देव पुसण्याचे वस्त्र |
| हळकुंडे ५ | बेल ,दूर्वा | सुट्टे पैसे १० नाणी | नवीन वस्त्र |
| खारका ५ | फळे ५ | अत्तर | जानवीजोड |
| बदाम ५ | कापूर | उदबत्ती | पाट/ आसने |
| नारळ २ | तेल, तूप | तेलवाती, फुलवाती | ताटे २, वाट्या ६ |
| पळी, भांडे, तांब्या,ताम्हण,  अभिषेक पात्र इ. | | पंचामृत (दूध, दही, तूप, मध, साखर ) | |
| देवीचा अभिषेक असल्यास : ओटीचे सामान , गहू १ वाटी, ब्लाऊजपीस | | | |